**विशेष दिवाणी दावा क्र. ७५/२०२५ मधील निशाणी क्र. ३९ वरील आदेश**

**( नसरुद्दीन मुजावर विरुध्द सलीमा पठाण )**

**(CNR No.MHSN050029632025)**

प्रतिवादी क्र.७ ने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.७ चे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, कैफियत टंकलिखित करतेवेळी अनावधानाने सर्व्हे नं.४३६/१ ऐवजी ४६१/१ असे टंकलिखित झाले आहे. सदर चुक केवळ तांत्रीक स्वरुपाची असून प्रस्तावित सुधारणेमुळे वादीस पुर्वग्रहदुषित ठरणार नाही अथवा कैफियतीचे स्वरुप बदलणार नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. याउलट वादीचे कथनानुसार अर्जातील नमूद कारण संयुक्तीक नाही. अशा प्रकारची चुक होणे अभिप्रेत नाही. सर्व विचारांअती कैफियत तयार केली असून त्यामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. केवळ प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या हेतुने प्रस्तुत अर्ज दाखल केल्याचे त्यांनी प्रतिपादन करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीनी प्रतिवादी क्र.७ विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेबाबत दावा दाखल केल्याचे दिसते. तसेच प्रतिवादी क्र.१ ते ६ व ७ यांचेत वाद मिळकती संदर्भात दिनांक ०८/०७/२०२५ चे खरेदीखत दस्त क्र.३४१७ अवैध असल्याचे घोषीत करण्याबाबत अनुतोष मागितल्याचे दिसते. दाव्यातील परिच्छेद क्र. १ चे अवलोकन केले असता भुमापन क्र.४३६/१ ही वाद मिळकत असल्याचे दिसते. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते वाद मिळकत भुमापन क्र.४३६/१ संदर्भात असल्याचे दिसते. सदर बाब लक्षात घेता कैफियतीमध्ये भुमापन क्र. ४३६/१ ऐवजी ४६१/१ अनावधानाने टंकलिखित झाले असण्याची शक्यता अधिक वाटते. थोडक्यात अर्जातील नमुद कारण संयुक्तीक आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

४. याशिवाय दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ खालील अर्ज निकाली काढतेवेळी न्यायालयाने हे पाहणे आवश्यक आहे की, प्रस्तावित सुधारणा उभय पक्षातील वाद निराकरणाकरता उपयुक्त आहे अगर कसे, यथायोग्य काळजी घेवूनसुध्दा प्रस्तावित सुधारणा सुरुवातीचे टप्प्यावर करणे पक्षकारास अशक्य होते. मी या पूर्वीच विवेचन केले आहे की, अर्जातील नमूद कारण संयुक्तीक आहे. सबब, यथायोग्य काळजी घेवूनसिध्दा प्रतिवादी क्र.७ यास प्रस्तावित सुधारणा कैफियत तयार करतेवेळी करणे अशक्य होते असे माझे स्पष्ट मत आहे आहे. वाद मिळकत भुमापन क्र. ४३६/१ असल्यामुळे त्या संदर्भात प्रस्तावित सुधारणा उभय पक्षातील वाद निराकरणाकरीता उपयुक्त ठरणार आहे. याशिवाय अदयाप दाव्याची सुनावणी चालू झाली नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तावित सुधारणा वादीस पुर्वग्रहदुषित ठरणार नाही. किंवा प्रस्तावित सुधारणेमुळे कैफियतीचे स्वरुप बदलण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्राप्त परिस्थिती व उपरोक्त विवेचनाअंती मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादी क्र. ७ ने प्रस्तावित सुधारणा प्रस्तुत आदेश पारीत केल्यापासून १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्त कैफियत अभिलेखावर सादर करावी.

३. अर्जाचा खर्च मुळ दाव्यासोबत.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.01.06 11:23:55 +0530

इस्लामपूर. (भगवान म. कारलेकर)

दिनांकः- ०३/०१/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | – | सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | – | **०३/०१/२०२६.** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | **०६/०१/२०२६.** |